श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे राष्ट्रीय क्वीज स्पर्धेत यश

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तर्फे आयोजित राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन व्यावसायिक प्रश्नमंजुषा स्पर्धेत इचलकरंजी येथील व्यंकटेश महाविद्यालयाच्या कु. प्रीती सुरेश पवार, कु. चैतन्य विपुल पट्टेकरी, कु. साक्षी संजय गुगळे या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. 'क्रॅक द क्वीझ कॉन्कर द क्वीझ' या स्पर्धेमध्ये आंतरराष्ट्रीय उद्योग जगतातील घडामोडींवर अनेक प्रश्न विचारण्यात आले याच्यामध्ये प्रामुख्याने तीन फेऱ्या घेतल्या गेल्या या तिन्ही फेरीमध्ये व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ग्रुप आघाडीवर राहिला. या स्पर्धेसाठी विविध विद्यापीठातील अनेक महाविद्यालयानी सहभाग नोंदवला. विविध व्यावसायिकांचे नाव, कंपनीचे फाऊंडर्स, एमडी, सीईओ, सीएफओ आणि कंपनीचे हेडक्वार्टर याच्यावर आधारित पंधरा प्रश्न विचारण्यात आले होते. तसेच दुसऱ्या बजर फेरीमध्ये वीस प्रश्न कंपनीचे स्लोगन, टॅगलाईन आणि लोगो याबद्दल विचारण्यात आले होते. तिसऱ्या फेरीत पंधरा प्रश्न विचारण्यात आले होते आणि त्यासाठी पाच मिनिटांचा वेळ देण्यात आला होता आणि तिसऱ्या फेरी अंतिम स्पर्धेचा निकाल सांगण्यात आला व व्यंकटेश महाविद्यालयाच्या ग्रुपला प्रथम क्रमांक मिळाला. आर. आय. टी. कॉलेज चे एम. बी. ए. विभाग प्रमुख डॉ. के. एस. पाटील, डॉ. एल. एम. जोगळेकर आणि कॉर्डिनेटर डॉ. यू. एम. पडवळ यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. ए. माने यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धेतील यश मिळवण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. मिळालेल्या यशामुळे महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली गेली याबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले.